# आंतरराष्ट्रीय परिषदेत ४० कुलगुरूंसह दिग्गजांचा सहभाग

**● नागपूरला होणार परिषद**

**तभा वृत्तसेवा**
**अमरावती, ३० नोव्हेंबर**

'रिसर्च फॉर रिसर्जन' या विषयावर ११, ते १३ फेब्रुवारी २०१६ पर्यंत सर विश्वेश्वरय्या राष्ट्रीय प्रौद्योगिकी संस्थान, नागपूर येथे आंतरराष्ट्रीय परिषदेचे भारतीय शिक्षण मंडळ नागपूरच्या यजमान पदाखाली आयोजन करण्यात आले आहे. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नॅशनल एन्व्हायरमेंटल इंजिनिअरिंग रिसर्च इन्स्टिट्युट (निरी), डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय परिषद




विद्यापीठातील बैठकीत उपस्थित मान्यवर

होणार आहे.

संशोधनाला चालना मिळावी, या महत्तम उद्देशाने आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन होत असून, या परिषदेचा उद्देश संशोधनातील होलिस्टिक दृष्टिकोनाचा विकास व चालना देणे, भारतीयांच्या सर्वांगीण दृष्टिकोनांच्या बाबींचा अभ्यास, छोट्या-छोट्या बाबींवर होणाऱ्या नावीन्यपूर्ण संशोधनावर भर देणे, त्याचे डॉक्युमेंटेशन करणे, संशोधनाची उपयोगिता व योगदानाला प्रोत्साहन देणे, नेटवर्किंग रिसर्च, आंतरशिस्त विद्याशाखेंतर्गत संशोधनाला उत्तेजन आणि जीवनाचा सखोल व व्यापक अर्थ विस्तारीत करणे हा आहे.

या परिषदेकरिता शिक्षण, विज्ञान व तंत्रज्ञान, अर्थशास्त्र, पर्यावरण, भारतीय ज्ञान पद्धती, मानव्यशास्त्र, शैक्षणिक सुधारणा व सद्भाव हा मुख्य विषय ठेवण्यात आल्याची माहिती या परिषदेचे संयोजक डॉ. उज्वला चक्रदेव यांनी पॉवर पॉईन्ट प्रेझेन्टेशनद्वारा विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सभागृहात आयोजित सभेत दिली.

डॉ. चक्रदेव यांनी सांगितले, सहभागी संशोधकांना आपले संशोधन टंकलिखित स्वरूपात, दृकश्राव्य डॉक्युमेंटरी स्वरूपात, पीपीपी, पोस्टर्स व इतर स्वरूपात सुद्धा सादर करता येणार असून, त्याबाबतची सविस्तर माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे. याशिवाय संशोधक आपले संशोधन ई-मेलवर सुद्धा पाठवू शकतात.

परिषदेचे संयोजक सचिव डॉ. अरविंद जोशी यांनी माहिती देताना सांगितले, देश-विदेशातून या परिषदेला नामवंत संशोधक उपस्थित राहणार असून, ४० विद्यापीठांचे कुलगुरू, राज्यपाल कार्यालयातील शिक्षण व संशोधन कार्याचा प्रभार असलेले अधिकारी, विविध राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्याच्या वतीने तेथील उच्चपदस्थ अधिकारी, युजीसीएआयसीटीई यांसह उच्च शिक्षण क्षेत्रातील शिखर संस्थेचे अध्यक्ष व नामवंत व्यक्ती उपस्थित राहणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

संशोधनाच्या बाबतीत मार्गदर्शन करताना ते म्हणाले, उद्योगांनी स्वतंत्रपणे आर अँण्ड डी विभाग उद्योगांतर्गत सुरू केला आहे. कारण शैक्षणिक संस्थांमध्ये होत असलेल्या संशोधनाचा पाहिजे तितका उपयोग त्यांना होत नाही. म्हणून सर्व शैक्षणिक संस्थांनी पुढे येऊन मानवाच्या, समाजाच्या व देशाच्या विकासासाठी आवश्यक असलेले संशोधन करण्यास बळ व चालना मिळावी, यासाठी आंतरराष्ट्रीय परिषद महत्त्वाची ठरेल, असेही त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. जयकिरण तिडके म्हणाले की, रिसर्च फॉर रिसर्जनवरील आयोजित आंतरराष्ट्रीय परिषद संशोधकांसह उदयोन्मुख संशोधक विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त असून, या परिषदेत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा सहभाग राहणार असल्यामुळे या भागातील जास्तीत-जास्त संशोधकांनी सहभागी होऊन त्याचा लाभ घ्यावा.

तद्वतच आपले नावीन्यपूर्ण संशोधन सादर करण्याकरिता पुढे यावे, असे आवाहन त्यांनी करून आयोजकांना शुभेच्छा दिल्या. या परिषदेचे सहआयोजक सचिव डॉ. अनुप सागदेव, डॉ. लीना गहाणे असून, सहसंयोजक डॉ. राजेश बिन्नीवाले, डॉ. व्ही. के. देशपांडे, डॉ. मारोती पवार, डॉ. नेहा एम. वझलवार, डॉ. मधुसुदन पेन्ना, डॉ. श्रीराम रोकडे, डॉ. व्ही. के. खर्चे, डॉ. व्ही. एस. सपकाळ आहेत. यावेळी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू तथा केमिकल टेक्नॉलॉजी विभागप्रमुख डॉ. विलास सपकाळ यांनी सभेचे संचालन केले, तर बीसीयुडीचे संचालक डॉ. आर. एस. सपकाळ यांनी आभार मानले. सभेला विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांचे विभागप्रमुख व अधिकारी उपस्थित होते.